# निसर्ग रक्षण करू

आपण आपल्या हिताकरिता
जीवनदायी मार्ग धरू
निसर्ग रक्षण करू गड्यांनो, निसर्गरक्षण करू!

निसर्ग हाच आपला दाता
निसर्ग हाच आपला त्राता
निसर्ग झाला लहरी आता
पाणी म्हणजे खरेच जीवन
विहिरींचे पुनर्भरण करू
निसर्ग रक्षण करू गड्यांनो, निसर्ग रक्षण करू!

जलाशयातील रडती मासे
नदीमाता टाकते उसासे
नद्यांचा श्‍वास गुदमरतो आहे
नद्या स्वच्छ करण्यासाठी
आपणही श्रमदान करू
निसर्ग रक्षण करू गड्यांनो, निसर्ग रक्षण करू!

उन्हाळ्यातही नद्यांना महापूर
निसर्ग गेला मानवापासून दूर
जागतिक तापमान वाढीचे
परिणाम दिसती महाभयंकर
रसायनांचा वापर कमी करू
निसर्ग रक्षण करू गड्यांनो, निसर्ग रक्षण करू!

आपण सृष्टीचे केले शोषण
धूर, धूळ नि अतिसूक्ष्म कण
यांचेच आपण करतो श्‍वसन
निसर्गाचा ढळलेला समतोल
प्रयत्नपूर्वक आपणच सुधारू
निसर्ग रक्षण करू गड्यांनो, निसर्ग रक्षण करू!

फुलवून पिसारा मोराचे नर्तन
कोकीळ करते मंजुळ कूजन
निसर्गच घडवी देवाचे दर्शन
जल, जंगल, जमीन आपली
सुजलाम नि सुफलाम करू!
निसर्ग रक्षण करू गड्यांनो, निसर्ग रक्षण करू!

धरणीमातेला आम्ही जखमी केले
ऋतुमान सगळेच बदलून गेले
निसर्गचक्रच विस्कळीत झाले
दु:ख पृथ्वीचे हे कुणी जाणले?
प्लास्टिकचा वापर बंदच करू
निसर्ग रक्षण करू गड्यांनो, निसर्ग रक्षण करू!

स्वार्थाने सृष्टीचे शोषण केले
निसर्गावरच आक्रमण केले
झुळझुळत्या झऱ्यांचे संगीत
ऐन पावसाळ्यात हरवून गेले
वेळीच निसर्गभान जागे करू
निसर्ग रक्षण करू गड्यांनो, निसर्ग रक्षण करू!

**डॉ. सुरेश सावंत,**
मोबा. ९४२२१७०६८९